# ३२ शोध

खूप वर्षापूर्वी एक गोष्ट वाचली होती . गोष्ट एका म्हातारीची आहे . एका गावात एक म्हातारी रहात असते . एक दिवस ती घराच्या अंगणात काही तरी शोधत असते . म्हातारीला गावातले सगळेजण ओळखत असतात . दोन तरूण म्हातारीला मदत करायला येतात व विचारतात की आजी काय शोधताय ? म्हातारी म्हणते की माझी सुई हरवलेय ती शोधतेय . ते तरूण सुद्धा बराच वेळ शोधतात पण सुई काही सापडत नाही . शेवटी कंटाळून एक तरूण विचारतो की आजीबाई सुई अंगणातच हरवली होती का ? आजीबाई पटकन् सांगते की नाही रे माझ्या पोरांनो , सुई आत मध्ये पडवीत हरवली पण बाहेर आता उजेड आहे म्हणून मी प्रथम तेथेच शोध घेते आहे . थोडयावेळात दिवेलागणी झाली की मग शोधता येणार नाही . ते तरूण कपाळावर हात मारून निघून जातात . त्या म्हातारीला सुई मिळणे अर्थातच शक्य नसते कारण सुई पडवीत हरवली असते व शोध दुसरीकडेच चालू असतो .

गोष्ट एवढीच आहे पण आपल्याला खूप विचार करायला लावणारी आहे . म्हातारी वेडी होती का कि ती वेळ घालवण्यासाठी हे सर्व करत होती ह्यात मला फारसा रस नाही .

ब-याच माणसांची गत ह्या म्हातारी सारखीच असते . सतत काहीही तरी हवे असते , कशाचा तरी नाद लागलेला असतो आणि हे सर्व मिळविण्यासाठी शोधही चालू असतो . बरेच वेळा चुकीच्या ठिकाणी .

उदाहरण द्यायचे तर माणसाला सुख हवे असते . ते सुख तो कोठेतरी शोधत असतो . पण सुख म्हणजे नेमके काय व ते कोठे मिळेल हे त्याला माहीत नसते . भ्रामककल्पनेत तो शोध घेतो व हाती काहीबाही लागल्यानंतर त्याला वाटते की हे सुख नव्हे . हे मी शोधत नव्हतो .

हा सर्व भ्रमनिराव टाळायचा असेल तर आपल्या आयुष्यातील सुख , ध्येय आपल्याला निश्चित करता आले पाहिजे . ते कसे व किती मिळू शकेल याचा अंदाज करता आला पाहिजे . आपली कुवत ओळखता आली पाहिजे आणि मुख्य म्हणजे आपल्या लायकीला नेमके किती मिळेल हे ठरवता आले पाहिजे .

ह्या सर्व गोष्टींचे भान ठेवून आपण वागलो तर मिळेल ते सुखच असेल . शेवटी एक गोष्ट प्रत्येकाने लक्षात घेतली पाहिजे की आपल्याला जे पाहिजे ते मिळेल असे नाही पण त्यामुळेच जे मिळाले त्यावरच प्रेम करायला शिकले पाहिजे . ‘ You may not get what you love, so you should love what you get.’

एक लक्षात ठेवले पाहिजे की प्रत्येकालाच जगातले जे जे चांगले आहे ते हवे असते पण हे कसे शक्य आहे ?

एखादी गोष्ट मिळवण्यासाठी अपार श्रम + बुद्धिमत्ता व नशीब याची साथ मिळणे आवश्यक असते. आपल्या हातात फक्त प्रामाणिक श्रम करणे असते. बुद्धिमत्ता आपण जन्माबरोबर घेऊन येतो. प्रयत्नांनी थोडी फार सुधारणा आपण घडवून आणू शकतो आणि नशीब हे आपल्या पूर्वसूकृतावर अवलंबून असते व नशीबवाला आपण ग्राह्य धरू शकत नाही. असो.

काय दोस्तांनो सांगायला गेलो एक गोष्ट पण गोष्ट सांगता सांगता खूप गंभीर विषयाकडे वळत गेलो. पण खरेच ईलाज नाही. आयुष्य आहेच मुळी अनाकलनिय आणि त्यामुळे काहीवेळा गंभीर पणे विचार केला नाही तर खरच हातात काहीच गवसणार नाही.

काही वेगळा विचार मनात येतोय का ? जरूर कळवा मला. मी वाट पाहतोय!!